# धर्मराज्य पक्ष

अध्यक्ष
**राजन राजे**

संदर्भ क्र.________________ दिनांक : १४/०२/२०१५

**प्रसिध्दीकरिता**

# ‘सुसंस्कृत कोपरी-सुरक्षित कोपरी’ अभियानासाठी ‘धर्मराज्य पक्षा’तर्फे ठाणे सह-पोलिस आयुक्तांना निवेदन

**प्रतिनिधी**

दि. १४ - ठाणे शहरातील कोपरी विभागातील बेकायदेशीर चालणारे मटका, जुगार, लेडिजबार, लॉज, मसाज पार्लर, वेश्या व्यवसाय, बेकायदा वाहतूक, फटाक्यांची धोकादायक दुकाने यांसदर्भात दि. १३ जानेवारी-२०१५ रोजी सविस्तर माहिती काही वृत्तपत्रांमध्ये आली असताना देखील अंदाजे १५ दिवसाच्या अंतराने दि. ३ फेब्रुवारी-२०१५ रोजी या विभागातील तथाकथित मटका किंग, काही राजकीय कार्यकर्ते व पोलिस कर्मचारी यांनी जो काही कायदा-सुव्यवस्था व सामाजिक स्वास्थ्य वेशीवर टांगण्याचा प्रयत्न केला. त्याने ठाणेकर नागरिक म्हणून आमची मान शरमेने खाली गेलीच, पण त्यापेक्षा पोलिसांच्या नैतिक जबाबदारीविषयी सुस्पष्ट असे प्रश्नचिन्ह उभे राहिले. यामुळे पोलीसांच्या कार्यक्षमतेवरच नव्हे, तर त्यांच्या अर्थपूर्ण हेतुवरच शिक्कामोर्तब होऊ घातले आहे.

या सर्व प्रकरणात, एक कार्यतत्पर प्रशासकीय अधिकारी म्हणून आपण त्याची उचित दखल घेऊन, या प्रकरणातील दोषींवर योग्य ती कायदेशीर कारवाई करून, पोलिसांची मलिन प्रतिमा सुधारण्याचे जोखमीचे काम पुन्हा एकदा नव्याने हाती घ्यावे व एक सुदृढ व सुसंस्कृत वातावरण तयार करावे, अशा प्रकारच्या मागणीचे निवेदन ठाणे सह-पोलिस आयुक्त **मा. व्ही.व्ही लक्ष्मीनारायण** यांना **‘धर्मराज्य पक्षा’**चे ठाणे जिल्हा सचिव नरेंद्र पंडित, ठाणे शहर उपाध्यक्ष विनोद मोरे, ठाणे शहर सहसचिव विजय भोसले यांच्यावतीने देण्यात आले. यावेळी ठाणे सह-पोलिस आयुक्तांकडून **‘सुसंस्कृत कोपरी, सुरक्षित कोपरी’** या अभियानासाठी सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला.

ए/ए२०३, ‘पांचजन्य’-२, रिगलप्लाझा-लोकपुरम प्रिमायसेस् को.ऑ.हौ. सोसायटी, ग्लॅडीज् अल्वारिस मार्ग, पोखरण रोड नं.२, ठाणे (प.)-४०० ६१०, दूरध्वनी : २१७१ ६७२१ / ८१०८१ २५०००

७/६०१-६०२, ‘पांचजन्य’, शुभारंभ, फेज-१, कोकणी पाडा मार्ग, द्वारा-घोडबंदर रोड, मानपाडा, ठाणे (प.)-४०० ६१०. दूरध्वनी : ६५२७ ०००१ / २७७९ ०६७००

*“सर्व सामान्यांचं जीवन-मरण आणि पर्यावरण, हवं एवढयासाठीच राजकारण!”...*